शासकीय सेवेत मागासवर्गीयासाठी आरक्षित पदे - विविक्त पद - सर्वोच्च न्यायालयाचा निकाल.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ सप्टेंबर १९८९.

पहा:-[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी-१०६४/चार-जे, दिनांक १६ एप्रिल १९६५.

[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०७९/१५५/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर १९७९.

[३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १ मार्च १९८९.

## प रि प त्र क

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १ मार्च १९८९ अन्वये फक्त एकच पद (Isolated Post) असलेल्या संवर्गात सुरवातीच्या अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती याबाबतचे आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिनराखीव म्हणून समजण्यात येईल असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरील आदेशांना पुढील आदेश होईपर्यन्त तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. ही स्थगिती ह्या परिपत्रकाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. सर्व नियुक्ती अधिका-यांनी मागासवर्गीयांकरिता भरतीच्या त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या वेळी पदे राखून ठेवण्यासंबंधीच्या विविध आदेशांची अंमलबजावणी करताना वरील आदेशाची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.द. माळवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,

[कृ.मा.प.]

शामम-रोटा-साप्रवि-एच-८८४[३,५००-१०-८९]

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
x प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
x आयुक्त, अनुसूचित जाती/जमाती, नवी दिल्ली,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
x सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

---

x पत्राव्दारे.

---

एच-८८५[३,५००-१०-८९]-३